# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन ,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ईमेल- : srapune@yahoo.in वेबसाईट :www.srapune.gov.in

जा.क्र. झोपुप्रा/तां-१/भोप्र/मा.क्र.६३/९८८/२०२४ दि. ०२/०८/२०२४.

## अंशत: भोगवटा प्रमाणपत्र

वाचा - १) प्रथम बांधकाम परवानगी (मूळ CC) क्र.१४१६/२०२१ दि.३०/०८/२०२१.
२) सुधारित बांधकाम परवानगी क्र.१३१४/२०२४, दि.२२/०५/२०२४.
३) विकसक यांनी केलेला अंशत: भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा दि.११/०७/२०२४ रोजीचे विनंती अर्ज.

---

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलमे २५३/२५४ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे **मौजे हडपसर, पुणे, स.नं. २२४/२/१ पैकी, २२४/२/२ पैकी व कदमवस्ती, हडपसर, सि.स. नं.१२९९ ते १३२६ व १३२७ पैकी (२२६अ/१/१ पैकी)** येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील इमारतीस या कार्यालयाकडून क्र.१३१४/२०२४, दि.२२/०५/२०२४ अन्वये बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे विक्री घटक K इमारतीमधील ३ मजल्यांचे काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील गाळ्यांसाठी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याबाबत विकसक मे.कुमार बेहरे राठी यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार विक्री घटक K इमारतीस अंशत: भोगवटा प्रमाणपत्र खालील प्रमाणे देणेत येत आहे.

विक्री घटक इमारत K:- विक्री घटक :- ७१ दुकाने

| अ.क्र. | मजले | सदनिका/दुकान क्र. (विक्री घटक) | एकूण सदनिका/ दुकाने |
|---|---|---|---|
| १) | Upper Ground Floor | दुकान क्र. १ ते २५ | २५ दुकाने |
| २) | Mezzanine Floor | | |
| ३) | पहिला | दुकान क्र.१०१ ते १२३ | २३दुकाने |
| ४) | दुसरा | दुकान क्र.२०१ ते २२३ | २३दुकाने |
| | | ७१ दुकाने | ७१ दुकाने |

प्रस्तुत प्रकरणी भोगवटा देणेकामी खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

अटी:-

१) प्रस्तुत अंशत: भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र

प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) अंशत: भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तीचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) इमारतीचे सर्व बाजुने असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) खुले ठेवणे बंधनकारक आहे.

६) विकसकामार्फत सादर दि.३०/०७/२०२४ रोजीचे हमीपत्रामधील व बंधपत्रामधील बाबी विकसकावर बंधनकारक राहील.

७) पुनर्वसन घटकास भोगवटा प्रमाणपत्र अदा केलेनंतरच विक्री घटकास भोगवटा प्रमाणपत्र अदा करणेत येईल.

८) योजनेसाठी अंतिम भोगवटा प्रमाणपत्र अदा करणेपुर्वी अंतिम Fire NOC कार्यालयात सादर करणे विकसकास बंधनकारक राहील.

९) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

१०) विषयांकित योजना रस्तारूंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र असल्यास म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, अंतिम टप्प्यातील टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

{ मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दि.०२/०८/२०२४ रोजीचे मान्यतेने }

सहायक संचालक नगर रचना,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

प्रत :- १. विकसक मे. कुमार बेहेरे राठी
२४०९, इस्ट स्ट्रिट, पुणे-४११००१.

२.वास्तुविशारद एट्रियम डिझायन स्टुडियो.
गाळा क्र.४१/४२, महावीर दर्शन कॉम्प्लेक्स, २६७/अ, भवानी पेठ, पुणे-४११०४२.

३. तहसिलदार,ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव सादर.

४. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.

Received